# 'परदेशात शिक्षण आणि रोजगाराच्या संधी' चर्चासत्राला प्रतिसाद



**नागपूर :** 'परदेशात विशेषतः जपानमध्ये विविध क्षेत्रांत उपलब्ध शिक्षण आणि रोजगाराच्या संधी', विषयावर अलीकडेच चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांनी मार्गदर्शन केले. एनएचएच जपान, दीक्षाभूमी स्मारक समिती आणि विक्तुछाया बहुउद्देशीय संस्थेतर्फे या दीक्षाभूमी परिसरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृहात हे चर्चासत्र झाले. या चर्चासत्रात जपान येथील मेक्सिस कंपनीचे संचालक ईचिरो कोईके, एआयएम जपानचे संचालक नोझाकी मासाहिरो, अर्चना मोटघरे, जपान वेल्फेअर कन्सल्टेटिव्ह संघटनेचे शिबाता कोसाई, टाकेडा शुआई, एनएचएच जपानचे कार्यकारी अधिकारी प्रज्वलित मोटघरे आणि विक्तुछाया बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक सिद्धार्थ देशभ्रतार प्रामुख्याने उपस्थित होते. परदेशातील संधीबाबत सांगताना सिद्धार्थ देशभ्रतार म्हणाले, सध्याच्या आव्हानात्मक परिस्थितीत शिक्षण हेच सर्वांगीण उन्नतीचे साधन आहे. उच्च शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांना स्वतःच्या विकासाबरोबरच समाजाच्या विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्रज्वलित मोटघरे यांनी, जपानमध्ये असलेल्या शिक्षण आणि रोजगाराच्या संधींबाबत विस्तृत माहिती दिली. सूत्रसंचालन प्रिया चांदुरकर यांनी केले व आभार मानले. बहुसंख्य विद्यार्थी, युवक व पालकांनी या चर्चासत्राचा लाभ घेतला.